क्रमांक : ५५६७/ ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २ जून, २०२६

## :: प रि प त्र क ::

**विषय : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२६ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकांबाबतचे विवरणपत्र .....**

महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२६ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. **सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ ते शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२६** या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरांबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

**ज्या विभागास प्रश्न चिन्हांकित केला आहे त्या विभागास असा प्रश्न अन्य विभागास हस्तांतरित करावयाचा असल्यास, विवरणपत्रात स्तंभ क्रमांक ५ मध्ये प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक दर्शविण्यात आलेला आहे. उक्त दिनांकानंतर प्रश्न हस्तांतरणाची प्रकरणे या सचिवालयास प्राप्त झाल्यास तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक/गट बदलून देता येणे शक्य होणार नाही. अशा स्थितीत त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी नेमून दिलेल्या दिनांकास उत्तर प्राप्त होणे आवश्यक राहील व संबंधित मा.मंत्री महोदयांना सदर तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराकरिता निश्चित केलेल्या मूळ दिवशीच सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील.**

**उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, तारांकित प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरीत होत असल्यास, विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सदर प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाची QIS या संगणक प्रणालीद्वारे कार्यवाही पूर्ण करावी व हस्तांतरणाबाबत विधानसभा प्रश्न कक्षाच्या b1.qust.mls@gmail.com या ई-मेलवर तातडीने पत्राद्वारे या सचिवालयास अवगत करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी.**

आपला
**( नागनाथ थिटे )**
सह सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(३) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

## महाराष्ट्र विधानसभा

## द्वितीय (पावसाळी) अधिवेशन, २०२६

तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक, विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक तसेच प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक (४) | प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| एक | (१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री<br>(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री<br>(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री<br>(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री<br>(७) वस्त्रोद्योग मंत्री<br>(८) सहकार मंत्री | सोमवार, दिनांक २२ जून, २०२६<br>सोमवार, दिनांक २९ जून, २०२६<br>सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ | बुधवार, दिनांक १७ जून,२०२६<br>सोमवार, दिनांक २२ जून, २०२६<br>सोमवार, दिनांक २९ जून, २०२६ | शुक्रवार, दिनांक १२ जून, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६<br>गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री<br>(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) परिवहन मंत्री | मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६<br>मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६<br>मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ | गुरुवार, दिनांक १८ जून, २०२६<br>मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६<br>मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ | शुक्रवार, दिनांक १२ जून, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६<br>गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ |
| तीन | (१) वैद्यकीय शिक्षण मंत्री<br>(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(३) मृद व जलसंधारण मंत्री<br>(४) उद्योग, मराठी भाषा मंत्री<br>(५) महिला व बालविकास मंत्री<br>(६) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री<br>(७) कामगार मंत्री<br>(८) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | बुधवार, दिनांक २४ जून, २०२६<br>बुधवार, दिनांक १ जुलै, २०२६<br>बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६ | गुरुवार, दिनांक १८ जून, २०२६<br>बुधवार, दिनांक २४ जून, २०२६<br>गुरुवार, दिनांक २ जुलै, २०२६ | शुक्रवार, दिनांक १२ जून, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६<br>गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ |

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक (४) | प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| चार | (१) महसूल मंत्री<br>(२) वने मंत्री<br>(३) आदिवासी विकास मंत्री<br>(४) कृषी मंत्री<br>(५) सामाजिक न्याय मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री<br>(७) मदत व पुनर्वसन मंत्री<br>(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६<br>गुरुवार, दिनांक २ जुलै, २०२६<br>गुरुवार, दिनांक ९ जुलै, २०२६ | शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६<br>गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६<br>शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ | शुक्रवार, दिनांक १२ जून, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६<br>गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ |
| पाच | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(४) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री | शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२६ | सोमवार, दिनांक २९ जून, २०२६<br>सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६ | शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६<br>गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ |